RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक ८(४)] सोमवार, एप्रिल २८, २०२५/वैशाख ८, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.**—महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. .. .. .. | **पृष्ठे** **१-२** |

दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.**

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९८१ चा महा. ५८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (४) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :– १९८१ चा महा. ५८.

"(४) "आस्थापना" म्हणजे, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ याच्या कलम २ च्या खंड (४) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे आस्थापना;". २०१७ चा महा. ६१.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :–

"(क) सुरक्षा रक्षकांची भरती करणे व त्यांना योजनेत प्रवेश देणे आणि सुरक्षा रक्षकांची नोंदणीपुस्तके व प्रतीक्षा यादी ठेवणे, नोंदणी पुस्तकांतील व प्रतीक्षा यादीतील त्यांची नावे, एकतर तात्पुरती किंवा कायमची काढून टाकणे किंवा पुन्हा समाविष्ट करणे, आणि नोंदणीसाठी फी लादणे यांसह सुरक्षा रक्षकांची व मूळ मालकांची नोंदणी करणे व नोंदणी रद्द करणे यांचे नियमन करणे ; ".

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१अ) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर कोणत्याही कारणास्तव सल्लागार समिती कार्यरत नसेल तर, राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी, सल्लागार समितीच्या सल्ल्याशिवाय किंवा तिच्याशी विचारविनिमय केल्याशिवाय, अधिसूचना काढता येईल किंवा निर्णय घेता येईल.";

(२) पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (६) (अ) राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त, सल्लागार समितीच्या सदस्यांचा पदावधी, त्यांच्या नावांची अधिसूचना, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका असेल. असे सदस्य, शासनाची मर्जी असेपर्यंत, पद धारण करतील.

(ब) राज्य शासन, राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांची रिक्त पदे, लवकरात लवकर व कोणत्याही परिस्थितीत, असे पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिने समाप्त होण्यापूर्वी भरील.".

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, स्पष्टीकरणातील, " चौदा " या मजकुराऐवजी, "अठरा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.